आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१२ सप्टेंबर २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाचे १५वे उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन यांनी घेतली शपथ

- ज्ञान भारतम मिशन हे भारताची संस्कृती, साहित्य आणि अभिमान यांचा आवाज बनेल, असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा विश्वास

- युपीआयच्या माध्यमातून सोमवारपासून दिवसाला १० लाखापर्यंतचे व्यवहार करता येणार

- म्युच्युअल फंडातून पैसे काढून घेताना लागणारं कमाल शुल्क ५ टक्क्यावरून ३ टक्के करण्याचा सेबीचा निर्णय

**आणि**

- हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, पुरूष दुहेरीत सात्विकसाईराज रन्कीरेड्डी आणि चिराग शेट्टी, तर एकेरीत लक्ष्य सेन उपांत्य फेरीत दाखल

**<><><><><>**

देशाचे १५वे उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन यांनी आज पदाची शपथ घेतली. नवी दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात झालेल्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राधाकृष्णन यांना शपथ दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, जगदीप धनखड, हमीद अन्सारी, एम. वेंकय्या नायडू हे माजी उपराष्ट्रपती, तसंच अमित शहा, नितीन गडकरी, राजनाथ सिंग, जे.पी.नड्डा, पीयुष गोयल हे केंद्रीय मंत्री आणि इतर मान्यवर शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते.

उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी आज राज्यसभेच्या अध्यक्षपदाचा कार्यभारही स्वीकारला.

**<><><><><>**

ज्ञान भारतम मिशन हे भारताची संस्कृती, साहित्य आणि अभिमान यांचा आवाज बनेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. ते आज “भारताच्या ज्ञानपरंपरेचा हस्तलिखित वारशाच्या माध्यमातून पुनर्शोध" या संकल्पनेवर आधारित तीन दिवसीय परिषदेचं औपचारिक उद्घाटन करताना बोलत होते. ही परिषद काल सुरु झाली. जगात फक्त भारतात एक कोटी हस्तलिखिते आहेत. कित्येक कोटी हस्तलिखिते नाहीशीही झाली आहेत, परंतु उपलब्ध असलेल्या हस्तलिखितांवरुन भारताशी समृद्ध ज्ञानपरंपरा लक्षात येते असं मोदी म्हणाले. ही परंपरा अजूनही जिवंत आहे आणि तिच्यातल्या मूल्य आणि संकल्पनांना आकार द्यायला हवा, असं ते म्हणाले.

भारताचा हस्तलिखितांचा वारसा आणि जागतिक ज्ञानकोशात त्याला मोलाचं स्थान देण्याच्या हेतूनं अनेक अभ्यासक, तंत्रज्ञ आणि इतरही या परिषदेत सहभागी झाले आहेत. प्रधान मंत्र्यांनी यावेळी ग्यान भरतम पोर्टलचं अनावरण केलं.

**<><><><><>**

एन पी सी आय नं व्यक्ती ते व्यापारी या प्रकारातल्या युपीआय व्यवहारांची मर्यादा दहा लाख रुपयांपर्यंत वाढवली आहे. येत्या १५ तारखेपासून हा बदल लागू होईल. मोठ्या रकमेच्या व्यवहारांवर मर्यादा असल्यामुळे ग्राहकांना व्यवहार विभाजित करून, किंवा धनादेश, बँक ट्रान्सफर यांसारख्या पारंपरिक पद्धती वापराव्या लागत होत्या, अशा क्षेत्रांना या निर्णयामुळे लाभ होणार आहे. मात्र, व्यक्ती ते व्यक्ती व्यवहारांची मर्यादा १ लाख रुपये प्रति दिवस अशी पूर्वीप्रमाणेच कायम राहणार आहे. इतर क्षेत्रातही युपीआय व्यवहाराची मर्यादा वाढवण्यात आली आहे. भांडवली बाजार आणि विमा क्षेत्रात गुंतवणूक मर्यादा प्रति व्यवहार २ लाखांवरून ५ लाख रुपये, तर ई-मार्केटप्लेसवरील शासकीय व्यवहार मर्यादा १ लाखांवरून ५ लाख रुपये करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे यूपीआयच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड बिल

भरणा आता प्रति दिवस ५ लाख रुपयांपर्यंत करता येणार असून, सोने-चांदी दागिने खरेदी आता १ लाख रुपयांऐवजी २ लाख रुपयांपर्यंत करता येणार आहे.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं तीन सप्टेंबरला अनेक क्षेत्रातल्या वस्तू आणि सेवा करात कपात करुन सर्वसामान्यांना दिलासा दिला. शालेय वापराच्या वस्तूंवरच्या कराबाबत जाणून घेऊया…

**होल्ड - कॅप्सुल -सूर्यकांत**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं या करदरात केलेल्या बदलांमुळे शालेय वापराच्या वस्तूंवर आता कर द्यावा लागणार नाही. त्यामुळे  वह्या, आलेखकागद, शार्पनर, पेन्सिल अशा अनेक वस्तू स्वस्त होतील. या महिन्याच्या बावीस तारखेपासून नवीन वस्तू आणि सेवा कराचे नवे दर लागू होणार आहेत. सरकारनं शालेय वापराच्या वस्तूंवरचा कर रद्द केल्यानं पालकांप्रमाणेच विद्यार्थी वर्गही खुशीत आहे. संचित कांबळे हा विद्यार्थी म्हणाला…

**होल्ड - बाईट - संचित**

*(वह्या, पेन्सिल, ड्रॉईंग शिट्स, कलर्स, शार्पनर, खोडरबर अशा गोष्टी सतत आम्हाला घरी मागाव्या लागतात. मग आईचा ओरडा खावा लागतो. आता हा खर्च कमी होईल, मग आम्हालाही फार ओरडा बसणार नाही. म्हणून मला वाटतं, हे चांगलं आहे.)*

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून दोन दिवसांच्या मिझोरम, मणिपूर, आसाम, पश्चिम बंगाल आणि बिहार दौऱ्यावर जाणार आहेत. उद्या सकाळी ते मिझोरममधल्या पहिल्या रेल्वे मार्गाचं उद्घाटन करतील. बैरबी ते साईरंग दरम्यानचा हा ५१ किलोमीटरचा रेल्वेमार्ग मिझोरमची राजधानी ऐझवालला जोडणार आहे. साइरंग ते

दिल्ली राजधानी एक्स्प्रेससह साइरंग-कोलकता आणि साइरंग - गुवाहाटी रेल्वेगाड्यांनाही ते हिरवा झेंडा दाखवतील.

दुपारी ते मणिपूरमध्ये साडे ८ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं लोकार्पण करतील. चुरा चंद्रपूर आणि इंफाळमध्ये जनसभेलाही संबोधित करणार आहे. संध्याकाळी प्रधानमंत्री गुवाहाटीमध्ये भारत रत्न डॉ. भुपेन हजारिका यांच्या जन्मशताब्दी निमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होतील.

**<><><><><>**

म्युच्युअल फंडातून पैसे काढून घेताना लागणारं कमाल शुल्क ५ टक्क्यावरून ३ टक्के करण्याचा निर्णय सेबी अर्थात भारतीय रोखे आणि विनिमय मंडळानं घेतला आहे. सेबीचे अध्यक्ष तूहीन कांत पांडे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. एक वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी म्युच्युअल फंडात गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांना हे शुल्क द्यावं लागतं.

देशातल्या आघाडीच्या ३० शहरांच्या शिवाय इतर ठिकाणी राहणाऱ्या नव्या गुंतवणूकदारांकडून, तसंच महिला गुंतवणूकदारांकडून mutual fund मध्ये गुंतवणूक मिळवणाऱ्या वितरकांना अधिक कमिशन द्यायलाही सेबीनं मान्यता दिली.

**<><><><><>**

हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत, पुरूष दुहेरीत सात्विकसाईराज रन्कीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं उपांत्य फेरीत धडक मारली आहे. उपांत्यपूर्व फेरीत त्यांनी आज मलेशियाच्या जुनैदी अरीफ आणि रॉय किंग याप या जोडीवर २१-१४, २०-२२, २१-१६ अशी मात केली. आता उपांत्य फेरीत त्यांचा सामना चीनी तैपेईच्या बी लिन आणि सी के तेन या जोडीशी होणार आहे.

पुरुष एकेरीत लक्ष्य सेननंही उपांत्य फेरी गाठली. आज झालेल्या उपांतपूर्व सामन्यात त्यानं भारताच्याच आयुष शेट्टीला २१-१६, १७-२१, २१-२३. असं पराभूत केलं.

**<><><><><>**

फिडे ग्रँड स्विस बुद्धिबळ स्पर्धेत महिला विश्वविजेती दिव्या देशमुखला या स्पर्धेत वाईल्डकार्डद्वारे प्रवेश मिळाला असून तिचा सामना थेट आठव्या फेरीत भारताचाच ग्रँडमास्टर डी गुकेश बरोबर  होणार आहे.

विश्वविजेता डी गुकेश ने तुर्कियेचा एडिझ गुरेल याच्याबरोबरचा सामना गमावला. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आता त्याला उरलेले सर्व सामने जिंकावे लागतील.

भारताचा ग्रँडमास्टर निहाल सरीन यानं इराणच्या परहम मगसूदलू वर विजय मिळवत साडेपाच गुणांची कमाई केली आहे. भारताच्या अर्जुन एरगेसीला हरवणाऱ्या जीएम मॅथियास ब्लूबॉम शी त्याने बरोबरी केली आहे.

**<><><><><>**

अल्बानियामधे जगातला पहिला एआय मंत्री  नियुक्त झाला आहे.  ऐकूया याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधी कडून….

**व्हॉईस कास्ट- गौरी**

भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी देशोदेशीची सरकारं वेगवेगळे प्रयत्न करीत असतात. त्या मुद्द्यावर सरकारं पडतात किंवा सत्तेवर येतातही. अल्बानिया देशातल्या सरकारने यावर तंत्रज्ञानाचा आधार घेतला आहे. तिथले प्रधानमंत्री एडी रामा यांनी  मंत्रिमंडळात चक्क  कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार झालेल्या  मंत्र्याचा समावेश केला आहे. सार्वजनिक कामांच्या निविदांबाबत निर्णय घेण्याचं काम त्याच्यावर सोपवलं असून ते पूर्णपणे भ्रष्टाचार मुक्त असेल असा दावा त्यांनी केला आहे. अल्बानियन भाषेत सूर्याला दिएला म्हणतात. तेच नाव या मंत्र्याला दिलं असून अल्बानियन पारंपरिक पोषाखातल्या स्त्रीचं रुप त्याला देण्यात आलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या ३४ जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदांसाठीची आरक्षण सोडत आज जाहीर झाली. त्यानुसार परभणी आणि वर्धा जिल्हा परिषदेचं अध्यक्षपद **अनुसूचित जाती**च्या उमेदवारासाठी आरक्षित राहील तर चंद्रपूर, बीड इथं **अनुसूचित जातीच्या महिला** उमेदवारांसाठी आरक्षित राहील.

**अनुसूचित जमातीच्या** उमेदवारांसाठी पालघर आणि नंदुरबार जिल्हा परिषदेचं अध्यक्षपद आरक्षित झालं असून अकोला, वाशिम, आणि अहिल्यानगर इथं **अनुसूचित जमातीच्या महिलां**साठी अध्यक्षपद राखीव असेल. **नागरिकांच्या मागास प्रवर्गा**साठी सोलापूर, हिंगोली आणि भंडारा जिल्हा परिषदेचं अध्यक्षपद राखीव असेल. **नांदेड, जालना, सातारा, धुळे आणि रत्नागिरी** जिल्हा परिषदेत नागरिकांच्या मागास प्रवर्गातल्या महिला उमेदवारांसाठी अध्यक्षपद राखीव ठेवलं आहे. **ठाणे, सांगली, कोल्हापूर, धाराशिव, लातूर, अमरावती, गोंदिया आणि गडचिरोली** जिल्हा परिषदांचं अध्यक्षपद सर्वसाधारण प्रवर्गातल्या महिला उमेदवारासाठी आरक्षित झालं आहे.

**//<><><><><>//**